# नियमित दिवाणी दावा नं.२५५/२००४ नि.२३२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दाव्यात काही कागदपत्रे दाखल करण्याकरीता व सदर कागदपत्रास निशाणी देण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन की, सदरहु दाव्यात नुकताच युक्तीवाद झालेला आहे. प्रतिवादी यांना महानगर पालिका अहिल्यानगर यांचेकडील नंदाबाई नाना शिंदे हयांच्या जन्माचा दाखला तसेच क.उच्च माध्यमिक विद्यालय, भाळवणी यांचेकडील त्यांचा शाळा सोडल्याचा मुळ दाखला नुकताच मिळाला आहे. त्यामुळे सदर कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देऊन ते पुराव्याचे कामी वाचण्यात यावे व सदर दस्तास निशाणी नंबर देण्यात यावे अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जावर त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला की, प्रतिवादीचा अर्ज या स्टेजला चालु शकत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादींचा युक्तीवाद झाला असुन प्रकरण प्रतिवादींच्या युक्तवादासाठी प्रलंबीत आहे. दावा २००४ सालातील आहे. २० वर्षात प्रतिवादींना कागदपत्र दाखल करता आलेले नाहीत. सदरचा अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास हेवी कॉस्ट करण्याचा हुकूम करण्यात यावा. पुढे त्यांचे कथन आहे की, सदरचे कागदपत्रांना निशाणी देऊन पुराव्याचे कामी वाचण्यास त्यांची हरकत नाही. परंतु झालेल्या उशीराबाबत हेवी कॉस्ट केल्या शिवाय अर्ज मंजुर करु नये अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. अर्जाचे व लेखी म्हणण्याचे अवलोकन केले दोन्ही पक्षाच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या अर्जातील व लेखी म्हणण्यातील कथनाचा पुनःउच्चार केला. दावा हा युक्तिवादासाठी प्रलंबीत आहे. प्रतिवादींनी सदरचे कागदपत्रे हे पुर्वी दाखल करणे अपेक्षीत होते. परंतु सदर कागदपत्रे ही त्यांना नुकतेच मिळाल्याचे त्यांचे कथन आहे. सदर कागदपत्राना निशाणी देण्यास वादींची हरकत नाही. तसेच सदर कागदपत्रे ही दावा गुणावदोषावर निकाली काढण्यास आवश्यक आहे. झालेल्या विलंबाबाबत वादीला कॉस्ट देता

येईल. परंतु प्रतिवादीला कागदपत्रे दाखल करण्याची संधी न दिल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

**आ दे श**

१) प्रतिवादी यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी यांनी अर्जाचा खर्चा म्हणुन रक्कम रुपये ३००/- ही वादींना पुढील तारखेपर्यंत अदा करावी.

KANAKDANDE SHRIHARI

Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2026.01.01 17:44:27 +0530

(एस.आर.कनकदंडे)

**दिनांकः०१/०१/२०२६.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**पारनेर, जि.अहमदनगर.**